राधाबाई शिंदे हायस्कूल

परिपत्रक क्रमांक :- १२८

प्राथमिक शिक्षण समिती, महानगरपालिका,
कोल्हापूर. दि. ०१.१०.२०१८.

मुख्याध्यापक,
सर्व प्राथमिक/माध्यमिक शाळा
शहर कोल्हापूर. (सर्व माध्यम)

विषय :- **समाजकल्याण विभाग जिल्हा परिषद, कोल्हापूर या कार्यालयाद्वारे राबवण्यात येणाऱ्या शिष्यवृत्ती योजनांचे वेळापत्रक सन २०१८-१९ बाबत.**

संदर्भ :- मा. जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जि. प. यांचेकडील क्र.को.जि.प./जिसकअ/अस्वच्छ/२०१८-१९/ दि. १८.०९.२०१८ चे पत्र.

उपरोक्त संदर्भिय विषयांकित प्रकरणी कळविणेत येते की, अस्वच्छ व्यवसायात काम करणाऱ्या पालकांच्या मुलांना भारत सरकार मॅट्रीकपुर्व शिष्यवृत्ती योजना राबविणेत येतात. जिल्हा परिषदेमार्फत सन २०१८-१९ या सालाकरिता अस्वच्छ व्यवसायात काम करणाऱ्या पालकांच्या मुलांना भारत सरकार मॅट्रीकपूर्व शिष्यवृत्ती योजना या योजनेचे प्रस्ताव सन २०१७-१८ (मागील वर्षी प्रमाणे) दिलेल्या ऑफलाईन प्रस्तावाप्रमाणेच प्रस्ताव सादर करावयाचे आहेत. अस्वच्छ व्यवसायात काम करणाऱ्या पालकांच्या मुलांसाठी मॅट्रीकपूर्व शिष्यवृत्ती योजनेचे प्रस्ताव हार्ड कॉपी व पेनड्राईव्ह मधून माहिती घेवून **मंगळवार दिनांक २३.१०.२०१८ रोजी दि न्यु एज्युकेशन सोसायटीकडील वि.म.लोहिया मुकबधिर विद्यालय, पेटाळा, कोल्हापूर** या ठिकाणी सकाळी १०.०० वाजता कॅम्पसाठी आपण स्वत: बिनचूक उपस्थित रहाणे बंधनकारक आहे. तसेच सदर योजनेसाठी पात्र ठरणारे कोणीही विद्यार्थी शिष्यवृत्ती मिळणेस वंचित रहाणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

| अ.क्र. | शहराचे नांव | दिनांक | निरिक्षकाचे नांव | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | कोल्हापूर शहर | २३.१०.२०१८ | श्री. एस.ए.गायकवाड | प्रस्ताव सादर करताना खालील सर्व बाबी आवश्यक आहेत.<br>१. मागील वर्षाप्रमाणे प्रस्ताव देणेत यावे.<br>२. मागील वर्षी दिलेल्या इंग्रजी फॉर्मेटनुसार वरील योजनांचे फॉर्मेट देणेत यावेत व पेनड्राईव्ह मधूनच इंग्रजी माहिती देणेत यावी. व सदरची माहिती **Calibri** या फॉन्ट मधून करुन देणेत यावी.<br>३. कॅम्पच्या वेळीच प्रस्ताव स्विकारले जातील त्या दिवसानंतर राहिलेल्या कोणत्याही शाळेचे प्रस्ताव स्विकारले जाणार नाहीत याची सर्व शाळांनी नोंद घ्यावी. |

(शंकर केशव यादव)
**प्रशासनाधिकारी,**
प्राथमिक शिक्षण समिती, महानगरपालिका,
कोल्हापूर.

प्रत माहितीसाठी सादर..
मा. जिल्हा समाज कल्याण अधिकारीसो,
समाज कल्याण कार्यालय, जि.प.कोल्हापूर